दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
● वर्ष २ रे ● अंक १०२ वा ● गुरुवार २९ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 102 | Date : 29/08/2024 | blow Sunday | Page 4 Price 4

गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

## देशात १२ शहरांमध्ये औद्योगिक पार्क उभारण्यास केंद्राची मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज (२८ ऑगस्ट) मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत देशातील विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली. या निर्णयानुसार, ९ राज्यांमध्ये १२ स्मार्ट औद्योगिक शहरे तयार करण्यात येणार आहेत. या माध्यमातून तब्बल १० लाख तरुणांना रोजगार मिळणार असल्याचं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयानुसार, नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत या १२ स्मार्ट औद्योगिक शहरे तयार करण्यात येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याचं सांगितलं जात आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकार तब्बल २८,६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितली आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले असल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान,



केंद्र सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी दिली. यामध्ये उत्तराखंडमधील खुरपिया, महाराष्ट्रातील दिघी, केरळमधील पलक्कड, पंजाबमधील राजपुरा-पटियाळा, उत्तर प्रदेशमधील आग्रा आणि प्रयागराज, बिहारमधील गया, तेलंगणामधील झहीराबाद, आंध्र प्रदेशमधील ओरवाकल व कोपर्थी, राजस्थानमधील जोधपूर व पाली या शहरांचा समावेश करण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी देण्याच्या निर्णयामुळे आता देशातील औद्योगिक स्मार्ट शहरांची सख्याही वाढेल. तसेच या शहरामध्ये जागतिक दर्जाची ग्रीनफिल्ड औद्योगिक स्मार्ट शहरे उभारली जातील. या औद्योगिक स्मार्ट सिटी प्रकल्पात सुमारे १० लाख लोकांना रोजगार मिळेल. याचबरोबर ३० लाख अप्रत्यक्षपणे नवीन रोजगार निर्माण होतील, असं केंद्र सरकारने स्पष्ट केलं आहे.

आज केंद्र । **पान २ वर**

## राज्यसभेवर १२ उमेदवारांची बिनविरोध निवड; एनडीएने गाठला बहुमताचा आकडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली :नुकताच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत १२ सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. यापैकी भाजपाचे नऊ, तर भाजपाचे मित्रपक्ष असलेल्या अजित पवार गट एक, राष्ट्रीय लोकमंचचा एक आणि काँग्रेसच्या एका सदस्याचा समावेश आहे. त्यामुळे आता राज्यसभेत एडीएच्या सदस्यांची संख्या ११२ वर पोहोचली आहे. विशेष म्हणजे या संख्येसह एनडीएला आता राज्यसभेत बहुमत प्राप्त झाले आहे.

नऊ सदस्य निवडून आल्यानंतर आता राज्यसभेत भाजपाच्या सदस्यांची संख्या ९६ वर पोहोचली आहे. तर विरोधकांची एकूण संख्या ८५ वर आली आहे. राज्यसभेच्या एकूण २४५ जागा आहेत. त्यापैकी आठ जागा रिक्त आहेत. त्यामध्ये जम्मू काश्मीरमधील चार आणि राष्ट्रपती नियुक्त चार जागांचा समावेश आहे. आहेत. त्यामुळे सद्यस्थिती राज्यसभेचे २३७ सदस्य आहेत. त्यानुसार बहुमतासाठी ११९ सदस्य असणे आवश्यक आहे.



भाजपाचे जे नऊ सदस्य निवडून आले आहेत, त्यामध्ये आसाममधून रामेश्र्वर तेली आणि मिशन रंजन दास, बिहारमधून मनन कुमार मिश्रा, हरियाणातून किरण चौधरी, मध्यप्रदेशामधून जॉर्ज कुरीअन, महाराष्ट्रातून धर्यैशील पाटील, ओडिशांतून ममता मोहंता, राजस्थानमधून रवनीत सिंह बिट्टू आणि त्रिपुरातून राजीव भट्टाचार्जी यांच्या समावेश आहे.याशिवाय भाजपाचे मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नितीन पाटील तसेच बिहारमधील राष्ट्रीय लोक मोर्चाचे उपेंद्र कुशवाह यांचा समावेश आहे. काँग्रेसच अभिषेक मनु सिंघवी सुद्धा राज्यसभेत बिनविरोध निवडून आले आहेत.महत्त्वाचे म्हणजे एनडीए गेल्या दशकभरापासून राज्यसभेत बहुमत मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. आता बऱ्याच काळानंतर एनडीएला राज्यसभेत बहुमत मिळालं आहे. या बहुमतानंतर आता विरोधकांच्या विरोधानंतरही एनडीएला विधेयकं पारीत करणं सोप्प जाणार आहे. मागच्या काही वर्षांत विरोधकांकडे बहुमत असल्याने त्यांनी भाजपा सरकारने आणलेल्या बहुतेक विधेयकांना विरोध करत ते रोखून धरले होते. त्यामुळे एनडीएवर बिजू जनता दल सारख्या पक्षांना हाताशी घेऊन ही विधेयकं पारीत करण्याची वेळ आली होती.

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस झुआरी सिमेंट कंपनीकडून चार संगणक भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूरातील नामवंत झुआरी सिमेंट लिमीटेड कंपनीकडून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड सोलापूर येथील संस्थेस कंपनीच्या सी.एस.आर फंडातून शैक्षणिक विकास उद्देशांतर्गत अद्यावत चार संगणक भेट दिले असल्याची माहिती औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सचिन धुमाळ यांनी दिली.

यावेळी झुआरी सिमेंट लिमीटेड कंपनीचे प्लॅट हेड सुनील कक्कर, सिनियर एच.आर शिवजी चौगुले,सहाय्यक एच.आर मॅनेजर अमोल जाधव , औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सचिन धुमाळ, उपप्राचार्य सुरेश भालचिम व प्रेटीस विभागाचे भिमाशंकर कोंडगुळी उपस्थित होते. आपली सामाजिक व शैक्षणिक बांधिलकी लक्षात घेऊन कंपनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर प्रशिक्षणार्थ्यांसाठी नेहमी मतद करेल असे प्लॅट हेड सुनील कक्कर यांनी सांगितले. तसेच कंपनीला इलेक्ट्रीशियन, जोडारी, मेसन, संधाता, तारतंत्री इत्यादी व्यवसायातील प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारीसाठी कंपनीकडे पाठवावे असे आवाहन सिनियर एच.आर. शिवाजी चौगुले यांनी केले.यावेही बोलताना संस्थेचे प्राचार्य धुमाळ यांनी कंपनीच्या सीएचआर फंडातून प्रशिक्षणार्थ्यांसाठी संगणक लॅब द्यावी अशी विनंती संस्थेतर्फे यावेळी केली. या कार्यक्रमाचे आभार.बसवराज मोटे यांनी मानले तर सुत्रसंचलन प्रविण केंदळे यांनी केले सदर कार्यक्रमास संस्थेतील सर्व गटनिर्देशक, निर्देशक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न प्रशंसनीय : राज्यपाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुणे : संशोधन चलित शिक्षण, आंतरविद्याशाखीय शिक्षण आणि शैक्षणिक बाबींसाठी उद्योगांसमवेत सहयोग या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा प्रयत्न प्रशंसनीय आहे, असे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काढले.सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्रदान समारंभात राज्यपाल बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी, कुलगुरू प्रा. सुनील भिरुड, कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. यशोधरा हरिभक्त आदी उपस्थित होते.

सीओईपी ही संस्था शैक्षणिक उत्कृष्टतेची दीपस्तंभ असून संस्थेच्या पहिल्या पदवीदान समारंभास उपस्थित राहताना आनंद होत असल्याचे सांगून राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, 'पूर्वेकडील ऑक्सफर्ड' आणि



राज्याची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे पुणे शहर दीर्घकाळापासून शिक्षणाचे माहेरघर आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे केंद्र आहे. ही संस्था केवळ शहरच नव्हे तर संपूर्ण राज्य आणि संपूर्ण देशात तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि शैक्षणिक विद्वत्तेचे केंद्र म्हणून आपली एक वेगळी प्रतिष्ठा जपत असताना भरभराट करत आहे.

तांत्रिक प्रगती, शैक्षणिक, संशोधन आणि विशेषत: महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सीओईपीने मोठी प्रगती केली आहे. महिला सक्षमीकरणासाठी विद्यापीठाची दृढ वचनबद्धता उल्लेखनीय आज पदवी मिळविणाऱ्या मुलींच्या मोठ्या संख्येतून दिसून येते. पदवीदान समारंभातील दीक्षांत मिरवणुकीचे नेतृत्व एक महिला करत असल्याचे पाहून विद्वान, नेतृत्व आणि बदल घडवणाऱ्या म्हणून स्वतःची भरभराट करू शकतील अशा महिलांसाठी सर्वसमावेशक वातावरणास प्रोत्साहन देण्याची विद्यापीठाची समर्पण भावना दिसून येते, असेही राज्यपाल म्हणाले. ते पुढे बोलताना । **पान २ वर**

## तुरुंगात अभिनेता दर्शनला विशेष वागणूक; मुख्य अधीक्षकांसह ९ तुरुंग अधिकारी निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

बंगळूरु : रेणुकास्वामी हत्येप्रकरणी सध्या न्यायालयीन कोठडीत असलेला कन्नड अभिनेता दर्शन थुगूदीपा याला विशेष वागणूक दिल्याच्या आरोपाखाली मुख्य तुरुंग अधीक्षक व्ही. सेशुमूर्ती आणि तुरुंग अधीक्षक मल्लिकार्जुन स्वामी यांच्यासह नऊ तुरुंग अधिकाऱ्यांना सोमवारी निलंबित करण्यात आले.शहरातील परप्पाना अग्रहारा येथील मध्यवर्ती कारागृहात दर्शन कॉफीचा मग हातात घेऊन धूम्रपान करतानाची छायाचित्रे समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर चौकशी करून ही कारवाई करण्यात आली. दोन कुख्यात गुन्हेगारांसह इतर तीन जणांबरोबर दर्शन तुरुंगाच्या आवारातील हिरवळीवर आरामात बसलेले या



छायाचित्रात दाखविण्यात आले आहे. ही छायाचित्रे प्रसारित झाल्यानंतर कर्नाटक सरकारवर जोरदार टीका करण्यात आली आणि तुरुंग प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्र्वरा यांनी याची दखल घेऊन नऊ अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली. सात अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले, तर कारागृहाला भेट देऊन अधिक माहिती गोळा केल्यानंतर मुख्य कारागृह अधीक्षक शेषमूर्ती आणि अधीक्षक मल्लिकार्जुन स्वामी यांना निलंबित करण्यात आले. या प्रकरणात त्यांचीच चूक असल्याचे गृहमंत्र्यांनी सांगितले. अभिनेत्याला सिगारेट, चहा आणि खुर्च्या कोणी पुरवल्या याचाही तपास केला जाईल, असेही ते म्हणाले.

## नागरी विमान वाहतूक मंत्रालयात महाराष्ट्रातील सोलापूर येथील विमानतळासंदर्भातील समस्यांचा आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः नागरी विमान वाहतूक मंत्रालयात महाराष्ट्रातील सोलापूर येथील विमानतळासंदर्भातील समस्यांचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय बैठक केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मा. श्री. राममोहन नायडूजी, मा.राज्यमंत्री श्री. मुरलीधर मोहोळजी अक्कलकोटचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाली.यावेळी खालील प्रमुख मुद्याच्या बाबतीत चर्चा झाली व लवकरात लवकर सोलापूर येथील विमातळ सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

✻ केंद्र सरकारने उडान-आरसीएसच्या माध्यमातून सोलापूर विमानतळावर ५० कोटी रुपये खर्च करून विविध विकासकामे केली आहेत.

✻ विमानतळावर आवश्यक मनुष्यबळांना प्रशिक्षण देणे सुरू असून लवकरच हे दल सेवेत दाखल होणार आहे.

✻ डीजीसीए लायसन्सची प्रक्रिया आणि इतर तांत्रिक गोष्टी लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना मंत्रीमहोदयांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

सोलापूर-मुंबई,सोलापूर-तिरुपती, सोलापूर-दिल्ली, सोलापूर-हैदराबाद आदी विमानसेवा सुरू करण्याबाबत विविध विमान कंपन्यांच्या प्रतिनिधींशी सकारात्मक चर्चा केली.

या बैठकीत केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री मा. श्री. राममोहन नायडू, मा.राज्यमंत्री श्री. मुरलीधर जी मोहोळ, विमानतळ प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. एम सुरेश, नियोजन आणि संचालन मंडळाचे सदस्य डॉ. शरद कुमार तथा आकासा, इंडिगो आदी विमान कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान....

## सर्व शासकीय यंत्रणांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी : निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार

**✻ सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर शहरातील होम मैदान येथे महिला सशक्तिकरण अभियान अंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा होणार ✻ या मेळाव्यासाठी जिल्ह्यातून ३० ते ४० हजार महिला लाभार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात सोलापूर येथे होत आहे. या मेळाव्यासाठी ३० ते ४० हजार महिला लाभार्थी उपस्थित राहण्याचे नियोजन केले जात आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रत्येक शासकीय यंत्रणेने त्यांच्या वर सोपवलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित मुख्यमंत्री महिला




सशक्तिकरण अभियान पूर्वतयारी आढावा बैठकीत उपजिल्हाधिकारी श्रीमती कुंभार बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, जिल्हा परिषदेचे महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, पोलीस उपाधीक्षक गृह विजया कुर्री, पोलीस उपायुक्त वाहतूक सुरेश खिरडकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.। **पान २ वर**

# संपादकीय

## समाजाच्या हिताचे नाही..

अनेक कुटुंबे न्यायालयाची पायरी चढतात. २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत राज्यात दरवर्षी सुमारे ३८ हजार खटले दाखल झाले. केंद्रीय विधी व न्याय खात्याने ही आकडेवारी माध्यमात जाहीर केली आहे. हा चिंतेचा विषय आहे. अनेक कुटुंबे मिळून समाज तयार होतो. परिणामी समस्येची कारणे शोधून त्यावर उपाय योजणे ही जाणत्यांची आणि ते उपाय अमलात आणणे ही लोकांची जबाबदारी आहे. याबाबतीत जाणत्यांचे निरीक्षण काय सांगते? नव्या पिढीत संयम कमी होत आहे. स्वातंत्र्य आणि समानतेचा चुकीचा अर्थ लावला जातो असे मत नागपूर कुटुंब न्यायालयातील ज्येष्ठ वकील रेखा बारहाते व्यक्त करतात. परस्पर सामंजस्य आणि सन्मान जपला तर वाद कमी होतील, असेही त्या म्हणाल्या. या उणिवा दूर करण्याची निकड सर्वांना सारखीच जाणवण्याची गरज आहे. याचाच परिणाम समाजस्वास्थ्यावर देखील होतो. समाजात बालगुन्हेगारी वाढत आहे. अडनिड्या वयाच्या मुलांचा सामाजिक गुन्ह्यात सहभाग आढळतो. पाचवीतील मुलाने दप्तरात पिस्तूल आणले आणि मित्राला गोळी घालून ठार केल्याची घटना नुकतीच बिहारमध्ये घडली. उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंबव्यवस्था हे या समस्यांचे मूळ आहे. ज्याचे भयंकर परिणाम समाज अनुभवत आहे. काळानुसार जगण्याच्या पध्दतीत बदल अपरिहार्य आहेत. संयुक्त कुटुंबपध्दती छोटी होणे हे त्याचे चपखल उदहारण. त्याचे औचित्य पटवणारी कारणेही सांगितली जाऊ शकतात. तथापि त्याचा अर्थ मूल्ये बदलणे असा होऊ शकेल का? संयुक्त कुटुंबात भावभावनांचा निचरा घरातच होऊ शकायचा. अशी घरे सर्वांसाठी मूल्यांची शाळा होते. मोठी माणसे संयम, सहनशीलता, प्रसंगी मौन पाळणे याचा पुरस्कार करायची. तर छोट्यांवर संस्कार आणि मूल्ये रुजवली जायची. मुलांचे ऐकून घेणारे हक्काचे कान घरातच होते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा या भावनिक गरजांची पूर्तता आपोआपच व्हायची. चित्र फक्त छानच नसायचे. वाद, ताणतणाव आणि भांडणेही होती. तथापि ती संपवण्याचा विवेक काही जणांकडे तरी असायचा. तथापि कुटुंबे छोटी होताना या सगळ्या गोष्टींना पर्यायी व्यवस्था उभी करण्याच्या जबाबदाऱ्यांचा मात्र विसर पडला असावा का? त्याची जाणीव समाजाला सातत्याने करून देण्याची जबाबदारी जाणत्यांची आहे. कारण स्वस्थ कुटुंबातूनच उत्तम मुले म्हणजेच उत्तम माणूस घडतो. कोणत्याही कारणांवरून ती प्रक्रिया थांबणे समाजाच्या हिताचे नाही हेच आकडेवारी दर्शवते.

पान १ वरुन

## सर्व शासकीय यंत्रणांनी दिलेली

निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती कुंभार पुढे म्हणाल्या की, माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक शासकीय विभागांना जबाबदारीचे वाटप करण्यात आलेले आहे. दिलेल्या जबाबदारी प्रमाणे सर्व संबंधित विभाग प्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांच्याकडून चोखपणे काम करून घ्यावे. कोणत्याही विभागाला आपल्या कामाविषयी शंका असेल तर त्याचे निरसन तात्काळ करून घ्यावे, असेही त्यांनी सुचित केले. सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळी परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर तीस ते चाळीस हजार लाभार्थी बसण्याची व्यवस्था अत्यंत चांगली करावी. पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित ठेवून वाहतूक व्यवस्थेचे नियोजन ही काटेकोरपणे करावे. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी महिला लाभार्थी घेऊन येणे व मेळावा झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी सोडणे यासाठी आवश्यक असलेल्या बसेसची पूर्तता करावी. पुरवठा विभागाने लाभार्थ्यांसाठी जेवण व पाण्याची व्यवस्था करावी. तसेच सर्व संबंधित विभागाने परस्परात योग्य समन्वय ठेवून मेळावा व्यवस्थितपणे पार पडेल यासाठी प्रयत्न करावे. प्रत्येक तालुक्यातून लाभार्थी आणले जाणार आहेत, त्यासाठी लाभार्थ्यांच्या संख्या प्रमाणे प्रत्येक तालुक्याला बसेसचा पुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी लाभार्थी व्यवस्थितपणे कार्यक्रमाच्या ठिकाणी येतील व त्यानंतर ते व्यवस्थितपणे त्यांच्या घरी पोहोचतील याचे योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी सुचित केले.

तहसीलदार श्रीकांत पाटील यांनी या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक विभागावर सोपवण्यात आलेल्या जबाबदारीची माहिती बैठकीत सादर केली.

## देशात १२ शहरांमध्ये औद्योगिक

सरकारने देशातील १२ औद्योगिक स्मार्ट शहरांना मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. याचवेळी अजून दुसरेही काही महत्वाचे निर्णय घेतले. आज मंत्रिमंडळाने ६,४५६ कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चासह एकूण २९६ किलोमीटर लांबीच्या तीन मोठ्या रेल्वे पायाभूत प्रकल्पांनाही मंजूरी दिली आहे. या प्रकल्पांमुळे रेल्वे कनेक्टिव्हिटी मोठ्या प्रमाणात वाढेल आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल. विशेषत: ओडिशाच्या नुआपड़ा आणि झारखंडच्या पूर्व सिंगभूम या जिल्ह्यांना फायदा होणार आहे.

# दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासन कटिबद्ध : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

*** दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरात दिव्यांगांना अन्य शासकीय योजनेचा लाभ मिळण्यासाठी माहिती देण्यात येत आहे. * दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरात ६ दिवसात ४ हजार ८५९ लाभार्थ्यांची तपासणी *बार्शी येथील शिबिरात दोन दिवसात १ हजार ५९९ लाभार्थ्यांची तपासणी *दिनांक २९, ३० ऑगस्ट रोजी माळशिरस येथे दिव्यांग प्रमाणपत्र शिबिर होणार, जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी शिबिरात तपासणीसाठी येण्याचे आवाहन *पंढरपूर, अक्कलकोट व बार्शी तालुक्यात शिबिराला चांगला प्रतिसाद, उर्वरित तालुक्यातील शिबिर यशस्वी होण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा *जिल्ह्यात १९ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत दिव्यांग प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन *एकूण २२ दिव्यांग प्रमाणपत्र वाटप शिबिराच्या माध्यमातून १५ हजार ६६६ लाभार्थ्यांची तपासणी करून प्रमाणपत्र वाटप करण्याचे नियोजन *दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र लाभार्थ्यांना टपालाद्वारे घरपोच करणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान अंतर्गत दिव्यांग प्रमाणपत्र शिबिराचा सहावा दिवस संपला असून आज रोजी पर्यंत पंढरपूर अक्कलकोट बार्शी तालुक्यातील ४ हजार ८५९ लाभार्थ्यांनी शिबिरात तपासणी करून घेतलेली आहे. दिव्यांग व्यक्तीकडून जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित केलेल्या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शिबिराच्या ठिकाणी शासनाच्या अन्य योजना चा लाभ दिव्यांगाना देण्यासाठी संबंधित विभागाचे माहिती स्टॉल लावण्यात आलेले आहेत. अन्य शासकीय योजनातून दिव्यांगांना लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.



या अभियान अंतर्गत तपासणी व निदान विशेष मोहीम दिनांक १९ ऑगस्ट २०२४ पासून सुरू झालेले आहे. पंढरपूर व अक्कलकोट तालुकास्तरीय शिबिरे संपन्न झालेली आहेत या दोन्हीही शिबिरात ३२६० दिव्यांग लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली तर दिनांक २६ ऑगस्ट रोजी शिबिराच्या पाचव्या दिवशी बार्शी येथे ८०१ व २७ ऑगस्ट रोजी ७९८ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली असे एकूण सहा दिवसात ४ हजार ८५९ लाभार्थ्यांनी या विशेष मोहिमेअंतर्गत तपासणी करून घेतलेली आहे. या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दिव्यांगात्व प्रमाणपत्र त्यांनी दिलेल्या त्यांच्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठवण्याची व्यवस्था प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यात ही मोहीम १९ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात दोन दिवस याप्रमाणे २२ शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून या शिबिरातून १५ हजार ६६६ दिव्यांग लाभार्थ्यांना दिव्यांगात्वाची तपासणी करून प्रमाणपत्र देण्याचे नियोजन आहे. पंढरपूर अक्कलकोट या दोन तालुक्यातील तीन हजार दोनशे सात लाभार्थ्यांची तपासणी झालेली आहे. तर बार्शी येथे दिनांक २६ व २७ ऑगस्ट रोजी ग्रामीण रुग्णालयात हे शिबिर घेतले जात आहे. तरी प्रत्येक तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांनी या शिबिरात येऊन तपासणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले.

तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांनी या शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही अडचण होणार नाही याची खात्री करावी. तसेच शिबिराच्या ठिकाणी संबंधित तालुक्यातून दिव्यांग लाभार्थींची ने - आण करण्याची व्यवस्था अत्यंत चोख झाली पाहिजे यावर लक्ष ठेवावे. शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग लाभार्थ्यांना सर्व आवश्यक सुविधा अत्यंत दर्जेदार मिळाव्यात यासाठी आरोग्य यंत्रणा यांनी काळजी घ्यावी सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी देऊन शिबिरासाठी निधीची कोणतीही कमतरता नाही. येथे आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

*अन्य शासकीय योजनांची माहिती : शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या अन्य सर्व शासकीय योजनांची माहिती प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सर्व संबंधित विभागाने त्यांची यंत्रणा त्या ठिकाणी ठेवून अत्यंत व्यवस्थितपणे समजावून सांगावी तसेच दिव्यांग व्यक्ती योजनांसाठी पात्र ठरत असतील तर त्यांना त्या योजनांचा लाभ मिळण्याबाबतचे अर्ज जागेवरच भरून घ्यावेत. एक ही पात्र दिव्यांग लाभार्थी शासकीय योजना पासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले. दिव्यांगांना शासकीय योजनेचा लाभ देऊन त्यांच्यात कौशल्य निर्माण करून त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

*२२ शिबिरातून १५ हजार ६६६ दिव्यांग लाभार्थ्याची तपासणी होणार : जिल्ह्याच्या अकरा तालुक्यात प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण २२ शिबिराचे आयोजन करण्यात येत असून यासाठी १५ हजार ६६ दिव्यांग लाभार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. जिल्ह्यातील दिव्यांगांची संख्या १ लाख १५ हजार ७५५ इतकी असून यातील ६८% ग्रामीण भागातील तर शहरी भागातील ३२ टक्के दिव्यांग संख्या आहे. आशाताई आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी २७ कार्यशाळा घेण्यात आले असून त्यातून ३७४२ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मित्राचे संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.

*आरोग्य यंत्रणा- परस्परात समन्वय ठेवावा : या अभियानात आरोग्य यंत्रणा, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, समाज कल्याणचे अधिकारी, स्वयंसेवी संस्था व मिशन इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग रिसर्च अँड क्शन(मित्रा) यंत्रणेवर जबाबदारी असून हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्परात समन्वय ठेवून काम करावे अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. त्याप्रमाणे जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय अंतर्गत येणारे सर्व वैद्यकीय अधिकारी कर्मचारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अंतर्गत येणारे सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी हे या शिबिरासाठी विशेष मेहनत घेत आहेत. असेच काम करून दिव्यांग व्यक्तींची योग्य तपासणी करून त्यांना वैश्र्विक प्रमाणपत्र वेळेत मिळण्यासाठी सर्वांनी दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी असेही त्यांनी सूचित केले.

***शिबिराचे वेळापत्रक-** जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि वैश्र्विक ओळखपत्र देण्याकरीता दिव्यांगत्व प्रमाणपत्र तपासणी आणि निदान विशेष मोहिम कार्यक्रम शिबीर वेळापत्रक तालुका, लाभार्थी संख्या, शिबीर स्थळ, दिनांक, वार व वेळ निहाय पुढीलप्रमाणे -

* माळशिरस - १७२०, ग्रामीण रुग्णालय, माळशिरस, दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२४, गुरुवार व शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * सांगोला - १८०३, ग्रामीण रुग्णालय, सांगोला, दिनांक २ व ३ सप्टेंबर २०२४, सोमवार व मंगळवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * करमाळा - १६२९, ग्रामीण रुग्णालय, करमाळा, दिनांक ५ व ६ सप्टेंबर २०२४, गुरुवार व शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * मोहोळ - १८४१, ग्रामीण रुग्णालय, मोहोळ, दिनांक ९, १० व १२ सप्टेंबर २०२४, सोमवार, मंगळवार व गुरुवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * माढा - १२९२, ग्रामीण रुग्णालय, कुर्डूवाडी, दिनांक १३ व १४ सप्टेंबर २०२४, शुक्रवार व शनिवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * मंगळवेढा - ८०८, ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा, दिनांक १७ व १९ सप्टेंबर २०२४, मंगळवार व गुरुवार सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * सोलापूर दक्षिण - १२९४, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सोलापूर, दिनांक २० व २१ सप्टेंबर २०२४, शुक्रवार व शनिवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. * सोलापूर उत्तर - ५६१, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सोलापूर, दिनांक २३ सप्टेंबर २०२४, सोमवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता. **पंढरपूर व अक्कलकोट तालुक्याचे शिबिर संपन्न-* पंढरपूर - ग्रामीण रुग्णालय, पंढरपूर, दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४, सोमवार व मंगळवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता दिव्यांग तपासणी शिबिर संपन्न झाले. तर अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय, अक्कलकोट, दिनांक २२ व २३ ऑगस्ट २०२४, गुरुवार व शुक्रवारी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजता शिबिर संपन्न झाले.

पंढरपूर व अक्कलकोट तालुक्यात एकूण ३२६० दिव्यांग लाभार्थीची तपासणी करण्यात आली. यामध्ये दृष्टीहीन ४२२, बौद्धिक अपंगत्व ६५६, श्रवणदोष ५१७, लोकोमोटर अपंगत्व १३६६, बालरोग २९९ असे एकूण ३२६० रुग्णांची तपासणी करण्यात आली. तर शिबिराचा पाचवा दिवस व बार्शी तालुक्याचा पहिला दिवस दिनांक २६ ऑगस्ट २०२४ रोजी शिबिर घेण्यात आले. बार्शी येथील शिबिरात दोन दिवसात १ हजार ५९९ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यामध्ये दृष्टीने १७०, बौद्धिक अपंगत्व ३०४, श्रवणदोष २६८, लोकोमोटर अपंगत्व ५८५, बालरोग १३७ तर औषधे देण्यात आलेले रुग्ण १३५ आहेत, अशी माहिती संचालक अभिजीत राऊत यांनी दिली. तसेच माळशिरस ग्रामीण रुग्णालय येथे दिनांक २९ व ३० ऑगस्ट रोजी सकाळी नऊ ते दुपारी तीन या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरासाठी तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी तपासणीसाठी यावे असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत ..

म्हणाले, 'स्टडी इन इंडिया' उपक्रमाच्या माध्यमातून भारतातील विविध राज्ये तसेच जगभरातील देशांतील विद्यार्थ्यांचे स्वागत करून विविधतेला चालना देण्याचे विद्यापीठाचे प्रयत्न विशेष मान्यता मिळण्यासाठी पात्र आहेत. ही समृद्ध विविधता केवळ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक अनुभवच वाढवत नाही तर त्यांना जागतिक नागरिक बनण्यासाठी, सीमांचे बंधन तोडून आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज करते. सीओईपी सारख्या संस्थांद्वारेच आपण एक स्वावलंबी भारत घडवू, जिथे ज्ञान आणि कौशल्य विकास हातात हात घालून चालेल, आपल्या तरुणांना प्रगती आणि परिवर्तनाचे अग्रदूत होण्यासाठी सक्षम करेल, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने माहिती देताना राज्यपाल म्हणाले, या विद्यापीठाचा उद्देश हा आदिवासींना केवळ आदिवासी म्हणून ठेवण्याचा नव्हे तर त्यांच्यात जगाशी स्पर्धा करण्याची क्षमता निर्माण करणे हा असावा.आपल्या देशाची अर्थव्यवस्था सध्या जगात पाचव्या क्रमांकाची असून २०४७ पर्यंत जगात तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था व्हावी यासाठी प्रयत्न आहेत. त्यासाठी आपल्यासारख्या प्रशिक्षित आणि उच्चशिक्षित विद्यार्थ्यांकडून खूप अपेक्षा असून विकसीत भारत घडविण्याच्या प्रक्रियेत तुम्ही नक्कीच योगदान द्याल, असा विश्र्वासही राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.देशभरातील शिक्षण पद्धतीत अमूलाग्र सुधारणांच्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० ला प्रतिसाद मिळत आहे. आज जग गतीने बदलत असताना आपल्याला एकच अभ्यासक्रम वर्षानुवर्षे चालू ठेवता येणार नाही. बाजारपेठेतील गरजा, मागणीशी सुसंगता असणारा अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे. लेखी अभ्यासक्रम (थिअरी) आणि प्रात्यक्षिक यांच्यात अत्यंत जवळचा समन्वय गरजेचा आहे. वेगवेगळ्या विषयांची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विद्याशाखांचा अभ्यासक्रम शिकता येणे आवश्यक आहे, असेही राज्यपाल म्हणाले. शिक्षण, नवनिर्मिती आणि सांस्कृतिक विकासात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यावसायिक जीवन प्रवासाला सुरुवात करत असताना, या राज्याचा वारसा पुढे नेण्यासाठी त्याच्या विकासात आणि समृद्धीसाठी हातभार लावावा, अशी अपेक्षाही राज्यपालांनी व्यक्त केली.

भारत जगातील सर्वात तरुण राष्ट्र म्हणून उदयास आला असून ही आपली सर्वात मोठी ताकद आहे. ही ताकद जागतिक नेता बनण्याची आपली क्षमता वाढविते. तथापि, देशासमोर दारिद्र्य, बेरोजगारी, ऊर्जा, पाणीटंचाई आणि सुरक्षितता अशी आव्हानेही असून त्यावर मात करण्यासाठी नावीन्य, संशोधन, उद्यमशीलता आदी सर्वांचा वापर करणे आवश्यक आहे.देशांतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करताना आपण केवळ देशाचे नव्हे तर जगाचे नागरिक असल्याचे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आपल्या भविष्यातील पिढ्यांसाठी जगाचे नागरिक या नात्याने जागतिक स्तरावर भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्य करणे अत्यावश्यक आहे.

यावेळी डॉ.प्रमोद चौधरी म्हणाले, सीओईपीला एक दीर्घ परंपरा लाभली असून विशिष्ट नितीमूल्यांवर विद्यार्थी घडवले जातात. तांत्रिक कुशलतेसोबतच येथे शिकणारा विद्यार्थी भारताचा उद्याचा जबाबदार नागरिकही होईल, यादृष्टीने त्याची जडण-घडण केली जाते. समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सीओईपीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर योगदान दिले आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. सुनिल भिरूड यांनी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या भविष्यकालीन उपक्रमांबाबत माहिती देऊन विद्यापीठ अहवालाचे वाचन केले. माहिती देताना ते म्हणाले, आजच्या पदवीदान समारंभात विद्यापीठातील २४६ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येत असून विविध विद्याशाखांमध्ये प्रथम क्रमांकाची कामगिरी करणाऱ्या १२ विद्यार्थ्यांना रँक प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात येत आहे. याशिवाय ७७७ पदवीधर विद्यार्थ्यांना उत्तीर्ण प्रमाणपत्रे, उत्कृष्ट कामगिरीसाठी ९ पदवीधर विद्यार्थांना सुवर्ण पदके प्रदान करण्यात येत आहेत.कार्यक्रमास विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## घोसरवाड गावातील जागृत देवस्थान श्री सिद्धेश्र्वर देवाचा वर्धापन दिन साध्या पद्धतीने साजरा




पत्रकार नामदेव निर्मळे घोसरवाड तालुका शिरोळ ेथील जागृत देवस्थान गावचे आराध्य दैवत श्री सिद्धेश्र्वर देवाचा वर्धापन दिन दरवर्षी मोठ्या उत्साहात संपन्न होतो परंतु नुकतेच श्री सिद्धेश्र्वर देवाचे मानाचे अश्र्व यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यामुळे यावर्षी फक्त देवाची आकर्षक सजावट व अभिषेक प्रसाद देऊन साध्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त अनेक भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# लाडक्या बहिणीच्या पैशांवर दरोडा टाकणाऱ्या बँकांवर गुन्हा दाखल करा

## आरपीआयची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापुर/अतुल सोनकांबळेः मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे हजारो करोड रुपये विविध बँकांनी लाभार्थ्यांच्या खात्यावरुन लाथार्थ्याला न विचारता काढुन घेवुन लाडक्या बहिणीच्या खात्यातील पैशावर दरोडा टाकल्यामुळे संबंधीत सर्व बँकांवर दरोडयाचा गुन्हा नोंद होवून महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना न्याय मिळवून द्यावा अन्यथा आरपीआयच्या वतीने संबंधीत बँकांचे बँक मॅनेजर यांच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा इंदापुर तालुका आरपीआयचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे दिल आहे.



महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री लाडकी बहिण ही महत्वकांक्षी योजना सुरू केली आहे. राज्यातील महिला भगिनींना दरमहा १,५०० रुपयांची मदत देण्याचा शासनाकडून अत्यंत धाडसी निर्णय घेतला आहे. माहे जुलै २०२४ ते माहे ऑगस्ट २०२४ या दोन महिण्यांचे एकुण ३,००० रुपये राज्यातील लाडक्या बहिणींना महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आलेले आहेत. परंतु ते अनुदान बँकेत लाभार्थ्यांच्या नावावर जमा झाल्यानंतर बँकेने ते अनुदान परस्पर कर्जामध्ये अथवा इतर बँक प्रक्रियेत वळते करुन घेतले आहे. ज्या लाभार्थ्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा झाली आहे. त्या लाभार्थ्याकडून खात्याचा अनेक दिवसापासून वापर केला गेला नाही. तसेच खात्यावर कमी रक्कम असल्याने मोठया प्रमाणात बँकांनी दंडात्मक कारवाई केली आहे. ही सर्व रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावरुन तात्काळ वजा केली जात आहे. त्यामुळे दोन महिण्यांचे तीन हजार रुपये जमा होवुन सुध्दा बहिणींच्या हातात दमडाही आलेला नाही. त्यामुळे या योजनेचा खरा लाभ बँकांना झाला असून, हजारो करोडो रुपयांचा फायदा बँकांना झाला आहे. आणि लाभार्थी बहिणी या योजनेपासून वंचित होत आहेत. आणि त्या सर्व बहिणी आजच्या घडीला नाराज असल्याचे दिसुन येत आहे.

इंदापूर तालुक्यातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने झिरो बॅलन्सवर महिलांची खाती काढुन त्यांना सर्व अनुदानाचा लाभ मिळवून दिला आहे. परंतु इंदापूर तालुक्यातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सोडली तर इतर सर्व बँकांनी या बहिणींच्या पैशावर दरोडा टाकल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र शासनाचे पत्र कं. मबावि २०२४/प्र.क. ९६ (भाग २)/का २ या पत्राचा अवमान करणाऱ्या बँकांवर त्वरीत कारवाई करण्यात यावी. अशी मागणी सरवदे यांनी केली आहे.

# स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गोकुळ अष्टमी निमित्य पाळणा व गुलाल व आरती आणि धार्मिक कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंडळात दही हंडी उत्सव मोठ्या उत्सवात संपन्न झाला.दरम्यान मंडळाच्या महाप्रसादालयात गोकुळ अष्टमी निमित्य पाळणा व गुलाल व आरती आदि धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. पाळण्यास विविध फुलाने सजविण्यात आलेले होते.

शहरातील दही हंडी फोडण्याचा मान संस्थानकालीन, श्रीमंत विजयसिंहराजे भोसले चौकातील वडार समाजातील युवकांना असून, सदरजणांनी प्रमुख मार्गावरून ढोल ताश्याच्या गजरात युवक मिरवणूकीने अन्नछत्र मंडळात येऊन क्रेनच्या सहाय्याने उभारण्यात आलेली दही हंडी फोडण्यात आली. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, मल्लिकार्जुन बिराजदार, शहाजीबापू यादव, निखील पाटील, गोटू माने, अतिश पवार, प्रवीण घाडगे, पिंटू साठे, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्र्वनाथ कलशेट्टी, खंडेराव होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



# सैनिकांचे गाव म्हणून प्रचलित असलेल्या टाकळीवाडी चे जागृत देवस्थान श्री यल्लमा देवीची श्रावण महिन्यातील यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील ग्रामदैवत श्री यल्लमा देवी १९१८ पासून जागृत देवस्थान म्हणून प्रचलित आहे. श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी मोठ्या संख्येने भाविक भक्त देवीच्या दर्शनाला येत असतात. देवीच्या आशीर्वादाने सैनिकांचे गाव म्हणून प्रचलित आहे.तसेच श्री गुरुदत्त शुगर्स कारखाना गावामध्ये असल्यामुळे गाव आणखीन प्रचलित झालेली आहे. श्रावण महिन्यातील चौथ्या मंगळवारी महाप्रसादाचे आयोजन करून मोठ्या उत्सवामध्ये श्रावण यात्रा संपन्न झाली. पंचक्रोशीतील टाकळीवाडी, सैनिक टाकळी, जुने दानवाड, नवे दानवाड, दत्तवाड पंचक्रोशीतील जागृत देवस्थान अशी ख्याती आहे. अनेक भाविक भक्तांचे मनोकामना पूर्ण करणारी देवी असून अनेक भाविक मोठ्या आनंदाने देवीचे दर्शनाला आले होते. ऊन, वारा, पाऊस, याची जरा सुद्धा भाविकांच्या वर परिणाम होत नव्हता. देवीला आकर्षक अशी सजवण्यात आलेली होती.जवळजवळ १५००० हजार भाविक भक्तांनी प्रसादाचा आनंद घेतला. या देवीचे पुजारी आप्पासो बस्तवाडे व शितल बस्तवाडे हे दररोज पूजाअर्चा करतात.

# नांदेड येथील भाविकांकडून नामदेव पायरीचा दरवाजा चांदीने मडवून देण्यात येणार : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

## दरवाजासाठी सुमारे ३० किलो चांदीचा वापर करण्यात येणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरीच्या दरवाज्याला नांदेड येथील भाविक अरगुलवार परिवारातर्फे चांदी बसवून देणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

शंकर दिगंबर अरगुलवार व नरसिमलू दिगंबर अरगुलवार यांनी कै. दिगंबर तुकाराम अरगुलवार व कै. जनाबाई दिगंबर अरगुलवार या आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ सदरचे काम करून देणार आहेत. सदरचे भाविक हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून नियमित दर्शनासाठी येत असतात ते बिलोली जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून, सदर दरवाजासाठी सुमारे ३० किलो चांदीचा वापर करण्यात येणार असून, त्याची बाजार मूल्यानुसार सुमारे २६ लक्ष इतकी किंमत होत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# ड्रायव्हिंग शिकल्यानंतर अर्थार्जनासाठी उपयोग करा : पीआय अश्विनी भोसले




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी :वात्सल्य ट्रस्ट मुंबई आणि समाज विकास संस्था उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने (दि. २८)रोजी ड्रायव्हिंग प्रशिक्षण कोर्स उद्घाटन करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी जिल्ह्यातील विविध गावातून एकूण ५१ युवकांचे ॲडमिशन करण्यात आले असून उमरगा येथे उद्घाटनाचा कार्यक्रम प्रसन्न झाला. उमरगा पोलीस स्टेशनच्या पीआय अश्र्विनीताई भोसले,प्राध्यापक प्रभाकर कावळे सर,ज्योती कावळे, पत्रकार अमोल पाटील, समाज विकास संस्थेचे कार्यवाह भूमिपुत्र वाघ यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.प्रसंगी सर्व मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करताना पीआय अश्र्विनी भोसले ह्या म्हणाल्या की

उपजीविकेसाठी सर्वांनी व्यवस्थित प्रशिक्षण घेऊन नियमांचे काटेकोरपणाने पालन करावे.आपल्या हातातून चूक होणार नाही यासाठी खास विशेष काळजी घ्यावी.प्रशिक्षण पूर्ण करावे आणि आपल्या कुटुंबासाठी मदत व्हावी. अशी भावना पी आय अश्र्विनी भोसले यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी भूमिपुत्र वाघ यांनी समाज विकास संस्था आणि वात्सल लेटर मुंबई यांचे नेमके कार्य काय आहे ते कोणासाठी काम करतात याबद्दल सविस्तर मांडणी केली. सोबत जीवनातील मूल्य आणि गेल्या पंचवीस वर्षाचा कार्य आढावा ज्योतीताई कावळे यांनी मांडला,प्रभाकर कावळे जीवनाचे महत्त्व, नियमावली आणि जगण्याची रीत या विषयावरती मार्गदर्शन केले.तर अमोल पाटील यांनी कार्यरत असणाऱ्या समाज विकास संस्थेच्या बद्दल मांडणी केली. प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या जीपची पूजा करण्यात आली. त्यानंतर मार्गदर्शनाचा कार्यक्रम पार पडला हा कार्यक्रम कुलकर्णी ट्रॅव्हलिंग स्कूल आणि सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. सूत्रसंचालन प्रशांत ढवळे यांनी मांडले.

तर आयोजनाचे कार्य कुलकर्णी ड्रायव्हिंग स्कूलचे संयोजक देवणीकर यांनी केले.

# पेनुर येथे मोफत स्त्री रोग तपासणी शिबिर

## वंदे मातरम् सामाजिक संस्थेचे सहकार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : वंदे मातरम सामाजिक संस्था पेनुर व भाग्यश्री हॉस्पिटल मॅटर्निटी अँड नर्सिंग होम पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने, शिवानंद क्लिनिक पेनूर येथे भव्य मोफत स्त्रीरोग तपासणी व मोफत औषध उपचार शिबिर घेण्यात आले.

या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी समाधान गायकवाड यांनी रक्तदान शिबिरात एच.बी कमी असल्याने रक्तदान न करता महिलांना माघारी पाठवण्यात आले, त्यासाठी त्यांना मोफत गोळ्या देण्यात यावे व त्याचबरोबर गावातील सर्व स्त्रियांच्या इतरही समस्या तपासणे यासाठी डॉ.भाग्यश्री स्वामी यांनी पुढाकार घेऊन उपस्थिती दर्शवली व मार्गदर्शन केले,सदर शिबिरात ७५ महिलांच्या विविध समस्यांची मोफत तपासणी करण्यात आली तसेच त्यांना मोफत औषधोपचार देण्यात आला. सदर शिबिराचे सांगता भाग्यश्री हॉस्पिटल पंढरपूर चे प्रमुख डॉ.भाग्यश्री मॅडम यांचा सत्कार संस्थेचे सन्मान चिन्ह देऊन व एक रोप देऊन करण्यात आला.

सदर प्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉक्टर स्वामी मॅडम यांनी सदर शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असे मत व्यक्त केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवानंद क्लिनिक पेनूर चे डॉ.शुभम स्वामी व डॉ.पूजा भोसले-स्वामी यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सौ.स्नेहल गायकवाड ,मनीषा गवळी,रिना कसबे, सविता स्वामी,सज्जन गवळी,किशोर गवळी,दत्तात्रय शेंबडे,पंढरी शेंबडे,प्रथमेश सातव इत्यादींनी शिबिर यशस्वी पाडण्यासाठी प्रयत्न केले.

# संशोधन कार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यावश्यक : वैज्ञानिक डॉ.बी. सत्यनारायण

## स्वेरीमध्ये 'पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन २०२४' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'इस्रोच्या 'चांद्रयान-३' या ऐतिहासिक मोहीमेमुळे जगाबरोबरच भारतातील युवा संशोधकांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडला आहे. नवअभियंते व विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि स्वप्नांच्या पुर्ततेसाठी परिश्रम घ्यावेत. देशाच्या अंतराळ संशोधनामध्ये योगदान देण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रेरित असणे गरजेचे आहे. एकूणच संशोधन कार्यात विद्यार्थ्यांनी सहभाग घेणे व त्यायोगे देशाच्या विकासाला हातभार लावणे अत्यावश्यक आहे.' असे प्रतिपादन टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई येथील प्रख्यात वैज्ञानिक अधिकारी डॉ.बी. सत्यनारायण यांनी केले.

आयट्रिपलई, आयआयसी आणि एलाइट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन २०२४' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी





वैज्ञानिक अधिकारी डॉ.बी. सत्यनारायण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे हे होते. 'नवोपक्रमाची जोपासना: भारतीय विद्यार्थ्यांना सशक्त करण्यामध्ये इस्रोची भूमिका' या विषयावर वैज्ञानिक अधिकारी डॉ.बी. सत्यनारायण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यामध्ये स्पर्धात्मक कार्यक्रम, पोस्टर सादरीकरण आणि मॉडेल सादरीकरण यामधून विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता व तांत्रिक कौशल्ये प्रदर्शित केली. या स्पर्धांचे परीक्षण आशिष माकडेय यांनी केले. या उपक्रमाने केवळ भारताच्या अंतराळ क्षेत्रातील कामगिरीचाच सन्मान केला नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये या अद्ययावत आणि सतत विकसित होणाऱ्या क्षेत्रात करिअर करण्याचा उत्साह निर्माण केला. अध्यक्षीय भाषणात स्वेरीचे संस्थापक सचिव व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी 'विद्यार्थ्यांनी अंतराळ क्षेत्रातील नोकरीच्या संधीचा फायदा घेवून राष्ट्राच्या विकासासाठी भरीव योगदान द्यावे.' असे आवाहन केले. स्वेरीमध्ये 'पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन २०२४' उत्साहात आणि विविध उपक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला. मॉडेल सादरीकरण या उपक्रमामध्ये राधिका कालिदास आटकळे आणि पोस्टर सादरीकरण मध्ये साक्षी धनाजी शिंदे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आली. उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार त्यांच्या नेतृत्वाखाली व विभागातील इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी डॉ. हर्षवर्धन रोंगे, डॉ.सुमंत आनंद यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. एस.एस. गावडे आणि प्रा. एस.आर.वाघचवरे यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन डॉ. नीता कुलकर्णी आणि श्री. दिवाकर नळे यांनी केले तर विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांनी आभार मानले.

# श्रीक्षेत्र कानिफनाथ गड बोपगाव येथे पारंपारिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पुरंदर/प्रतिनिधी : नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्ट, व समस्त ग्रामस्थ बोपगाव, यांच्या वतीने हजारो भाविकांचे श्रद्धा स्थान श्रीक्षेत्र कानिफनाथ गड येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सवानिमित्त मंगळवार दिनांक २७/ ८/ २०२४ रोजी सकाळी ५. ते ७.अभिषेक व पूजा करण्यात आली. सकाळी ११ वाजता संत ज्ञानेश्र्वर भजनी मंडळ बोपगाव,व कानिफनाथ मळा भजनी मंडळ बोपगाव, व तसेच बाहेर गावाहून आलेले भजनी मंडळ,यांचा श्रीकृष्ण जन्मावर सुरेल असा भजनाचा कार्यक्रम झाला,१२.वाजता महा आ रती होऊन बरोबर १.वाजता कानिफनाथांचे भक्त सर्जेराव (नाना )जगदाळे यांच्या हस्ते पारंपारिक पद्धतीने दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ,पंचक्रोशी व संपूर्ण जिल्ह्यातून मोठ्या प्रमानात भाविक भक्त उपस्थित होते,दहीहंडी फोडल्यानंतर सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे आयोजन केले होते.या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन नवनाथ देवस्थान पंचायत कमीटी ट्रस्टचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव,खजिनदार, व सर्व संचालक मंडळ, यांनी केले होते.तसेच बोपगाव मधील सरपंच सर्व सदस्य,सोसायटीचे चेअरमन सर्व सदस्य, गावातील तरुण मंडळाचे अध्यक्ष व त्यांचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री वटवृक्ष देवस्थान ट्रस्टचे धार्मिक उपक्रमातील योगदान कौतुकास्पद : आ.पंकजाताई मुंडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/गौतम बाळशंकर : श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे धार्मिक क्षेत्रातील योगदान हे कौतुकास्पद असल्याचे मत महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे आमदार तथा भारतीय जनता पार्टीचे राज्य व राष्ट्रीय महासचिव पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी आमदार पंकजाताई मुंडे यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी पंकजाताई मुंडे बोलत होत्या.

पुढे बोलताना आमदार पंकजाताई मुंडे यांनी मंदिर समितीच्या वतीने वर्षभरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात हे माझ्या ऐकीवात असून यामुळे समाजात भक्तीप्रबोधनाचा प्रसार होत आहे. याबद्दल भक्तांमध्ये धार्मिक बांधिलकी वाढण्यास मदत होईल असे वक्तव्य करून वटवृक्ष मंदिरातील स्वच्छता व प्रसन्न वातावरण याबद्दलही समितीचे कौतुक केले. याप्रसंगी तालुक्याचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आनंद तानवडे, अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, भारतीय जनता पार्टी शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, पंचायत समितीचे माजी सदस्य बाळासाहेब मोरे, अक्कलकोट नॉर्थ पोलीस ठाण्याचे पी.आय.राजेंद्र टाकणे, आदींसह भारतीय जनता पार्टीचे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## वृत्तपत्र मंत्र्यासहित शासकीय बातम्यांवर बहिष्कार टाकणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : क वर्गातील वृत्तपत्रांना विशेष प्रसिद्धी मोहिमेतून वगळले राज्य सरकारकडून छोट्या वृत्तपत्रांना सावत्रपणाची वागणूक आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध विभागाच्या योजनांची प्रसिद्धी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्यावतीने विशेष जाहिरात प्रसिद्ध मोहीम राबविण्यात येणार असून यासाठी राज्य सरकारकडून कोट्यावधीचा निधीची तरतूद करण्यात आली आहे मात्र या प्रसिद्धी मोहिमेतून क वर्गातील लहान वृत्तपत्रे व साप्ताहिके यांना वगळण्यात आले असून राज्यातील मोठ्या व भांडवलदारी वृत्तपत्रांनाच या जाहिराती देण्यात येणार असल्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे त्यामुळे राज्यातील छोट्या वृत्तपत्र चालकाकडून याचा निषेध व्यक्त केला जात असून या विशेष प्रसिद्धी मोहिमे क वर्गातील उत्तर पत्रांचा समावेश न केल्यास आगामी काळात सरकारचा मंत्र्यांचा तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या शासकीय बातम्यांवर राज्यभरातील छोटी वृत्तपत्र बहिष्कार टाकतील असा इशारा राज्यातील क वर्ग संपादक संघाच्या वतीने देण्यात आला आहे देण्यात आला आहे

निवडणुकीपूर्व वातावरणात शासनाकडून मोठ्या योजनांच्या घोषणा केल्या जात असून त्यांच्या प्रसिद्धीसाठी मोठ्या प्रमाणावर जाहिरातीही केल्या जात आहेत मात्र शासनाकडून नेहमीच आणि निवडणूक पूर्व वातावरणातील जाहिरात वाटप करताना समन्वयी पद्धतीने वाटप न करता छोट्या कवर्गीय दैनिकावर अन्याय होत असल्याचे दिसत आहे शासन व सर्व जाहिराती केवळ मोठ्या म्हणजे अ वर्गीय मोठ्या वृत्तपत्रांनाच देत आहे

राज्यकर्त्यांची कोणीतरी ही गोष्ट छोटी जिल्हा दैनिक कोणी वाचतच नाही असा गैरसमज करून दिला आहे त्यामुळे बहुतेक जाहिरातीसाठी कवर्गीय वृत्तपत्रांना डावलेले जात आहे वास्तविक ही छोटी जिल्हा वृत्तपत्रे स्थानिकांची म्हणून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वाचले जातात ही वस्तुस्थिती असून शासनाची माहिती व जनसंपर्क महासंचालये यांच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लेख वृत्त यांना जशास तसे प्रसिद्धी देण्याचे काम ही छोटी वृत्तपत्रे करीत असतात हे वृत्तपत्रे म्हणजे शासनाचे दूध म्हणून कामही करत असताना सरकारकडून छोट्या वृत्तपत्रांना सावत्रपणाची वागणूक देत आहे

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारकडून राबवण्यात येणाऱ्या विविध विभागांच्या योजनेची प्रसिद्धी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्या वतीने विशेष जाहिरात प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून यासाठी राज्य सरकारकडून कोट्यावधीचा निधीची तरतूद करण्यात आली आहे काही दिवसापूर्वीच मुख्यमंत्री लाडके बहीण योजनेच्या प्रसिद्धीसाठी कोट्यावधी रुपये निधीची तरतूद करून यामध्ये केवळ आणि अ आणि ब वर्गातील वृत्तपत्रांना जाहिराती देण्याची धोरण आखले जात असल्यामुळे वर्ग यामुळे वर्ग क वृत्तपत्रावर मोठा अन्याय होत असल्याची भावना निर्माण होत असून राज्य सरकार बद्दल छोट्या वृत्तपत्रांमध्ये मोठा संताप व्यक्त केला जात आहे क वर्ग लघुउत्तपत्रावरील हा अन्याय दूर झाला नाही तर आपल्या सरकार बद्दल नकारात्मक प्रसिद्ध होईल आणि त्यांचे पडसाद गाव पातळीवर छोट्या वृत्तपत्रात उमटतील याची नोंद घेऊन झालेल्या अन्याय दूर करावा अशी मागणी राज्यातील छोटया वृत्तपत्र चालकांकडून होत आह

या विशेष प्रसिद्धी मोहिमेतून क वर्गातील लहान वृत्तपत्रे व साप्ताहिके यांना वगळण्यात आले असून राज्यातील छोट्या व भांडवलदारी वृत्तपत्रांचा या जाहिराती देण्यात येणार असल्याचे शासन निर्णय काढण्यात आला आहे

यामधून शासनमान्य क वर्गातील दैनिके व साप्ताहिकांना जाणीवपूर्वक वगळले आहे येत्या ३१ ऑगस्ट पर्यंत साप्ताहिक व लहू दैनिक विशेष जाहिरात प्रसिद्ध मोहिमेत समावेश न केल्यास १ सप्टेंबर पासून राज्य शासनाच्या मंत्रिमंडळातील मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री आणि सर्व मंत्र्यांच्या शासकीय बातम्यावर बहिष्कार टाकण्यात येईल असा इशारा राज्यातील कवर्ग वृत्तपत्रांच्या संपादकांनी मुख्यमंत्री यांना पाठवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे

## घोळसगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दही हंडी फोडणाचा कार्यक्रम ग्रामस्थ आणि बाळगोपाळ यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. घोळसगावचे ग्रामदैवत गुंडोबा मंदिराच्या प्रांगणात दही हंडी फोडणाचा कार्यक्रम झाला. श्री गुंडोबा गणेश उत्सव तरुण मंडळ यांच्या वतीने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला . श्री गुंडेराव पडसलगे यांच्या हस्ते पुजा करण्यात आली यावेळी सो गिला तारा या ग्याण्यावर मुलीनी डान्स सादर केला. यावेळी उपस्थित मुलानीही विविध कला सादर करत डान्स सादर केले. श्री कृष्णाच्या आवतारामध्ये स्वराज कत्ते यांनी दहीहंडी फोडण्यात आली. याप्रसंगी उपस्थित भिमाशंकर साळुंखे संजय घोडके विश्र्वनाथ नागुरे राजेद्र बादोले कलप्पा पडसलगे राहुल आलुरे विठ्ठल पाटील शिवनिगप्पा उमाटे प्रकाश आलुरे कलप्पा हडपद शिवाजी साळुंखे महेश बशेटे सोहेल फकीर शिवांदन कत्ते, उमेश अप्पा साळुंखे, लोकेश बादोले तोम पाटील सैपन मुल्ला, सुरेश पडसलगे, शुभम बादोले व गावातली माता भगिनी यांच्या सह असंख्य महीला व महिला मंडळ तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीकृष्ण जन्मसोहळ्याच्या दिवशी बाल चिमुकल्या राधिकेनी केले हंजगी आश्रम शाळेत वृक्षारोपण.

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

हंजगी/तिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेत आज श्रीकृष्ण जन्मसोहळ्याच्या दिवशी बाल चिमुकल्या राधिका संतोष सिंदगी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.कारण श्रीकृष्ण जन्मसोहळ्याच्या दिवशीच राधिका सिंदगी यांचा जन्म झाल्याने राधिका यांचे वडील संतोष महादेव सिंदगी यांनी आज हंजगी येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नदान करुन व या छोट्याशा राधिकेच्या हातून आश्रम शाळेत वृक्षारोपण करुन समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे.कारण दररोज तालुक्यात दिवसाढवळ्या राजरोसपणे हजारो झाडांची कत्तल केली जात असताना वनविभाग मात्र याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करताना दिसून येत आहे.तेव्हा या छोट्याशा राधिकेच्या हातून आज वृक्षारोपण करुन सिंदगी परिवारानी पर्यावरणप्रती जागृता आणि निसर्गाप्रती कृज्ञता व्यक्त केली आहे. यावेळी अक्कलकोट विधानसभेचे महिला इच्छुक उमेदवार पुजा पाटील,राहुल



पाटील, चंद्रशेखर निमल, माजी सरपंच उमेश पाटील, मोहसीन मुल्ला, संतोष म्हमाणे, महादेव सिंदगी, दत्ता साठे, निंगण्णा व्हनमाने,सागर सिंदगी, सतिश सिंदगी, संतोष सिंदगी, रेणुका सिंदगी, सत्यमा सिंदगी, कल्पना सिंदगी, महानंदा सिंदगी, शांताबाई शिवदे, पार्वती सिंदगी, विजय शिवदे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिध्दाराम चौधरी तर आभार हिरेमठ यांनी मानले.

## हर्षवर्धनजी पाटील युथ फाऊंडेशनच्या वतीने इंदापूर महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापुर/प्रतिनिधी : राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर महाविद्यालयातील क्रीडा संकुल या ठिकाणी हर्षवर्धनजी पाटील युथ फाऊंडेशनच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांच्या मार्गदर्शनानुसार उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे व विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर आणि मान्यवर युवकांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी युवक, युवती तसेच शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांनी रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान केले. युवा नेते राजेंद्र पवार म्हणाले की,' आमच्या सर्वांचे लाडके नेते हर्षवर्धन पाटील यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त हर्षवर्धन पाटील युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून तसेच युवा नेते राजवर्धन पाटील आणि अंकिता पाटील ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सलग दुसऱ्या वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.' युवा नेते बबलूभैय्या पठाण म्हणाले की,' रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. दरवर्षी आम्ही हर्षवर्धन पाटील साहेबांच्या वाढदिवसानिमित्त असा विधायक उपक्रम राबवत असतो. यावेळी युवा नेते तुषार खराडे , सागर गानबोटे , अमोलराजे इंगळे , मयूर शिंदे , दत्तू पांढरे , दादा पिसे , बाळासाहेब भोंगळे , मयूर देवकर , अतुल वाघमोडे, अमोल राऊत , अजित करळे ,बापू पारेकर यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

## श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या पूजा नोंदणीसाठी संगणक प्रणाली विकसित : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

✼ ऑनलाइन पद्धतीने पूजेची होणार नोंदणी
✼ भाविकांना घरबसल्या पूजा नोंद करता येणार;

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्यपुजा, पाद्यपूजा, तुळशी पूजा, चंदन उटी पूजा इत्यादी पूजा भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजा नोंदणी करण्यासाठी मंदिर समितीने संगणक प्रणाली विकसित केली असून लवकरच ऑनलाईन पद्धतीने पूजेची नोंदणी सुरू करण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

याबाबत मंदिर समितीच्या दि. २० ऑगस्ट रोजीच्या सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखालील सभेत निर्णय घेण्यात आला होता. यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली असून, भाविकांना पूजेची नोंदणी https://www.vitthalrukmi nim andir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. भाविकांना अल्प देणगी मूल्य आकारून विविध प्रकारच्या पूजा उपलब्ध करून देण्यात येतात. तथापि, सदर पूजांचे बुकिंग ऑनलाइन पद्धतीने करण्याबाबत भाविकांकडून मागणी होत होती.

याबाबतची संगणक प्रणाली विकसित झाली असून, याबाबत चाचणी घेण्याचे काम सुरू आहे. येत्या पंधरा दिवसात काम पूर्ण होऊन दि. ०१ ऑक्टोबर २०२४ पासून बुकिंग सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना घर बसल्या ऑनलाइन पद्धतीने पूजा नोंद करता येईल असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले

## निमसाखर येथे प्राणप्रतिष्ठा सोहळा साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः इंदापूर तालुक्यातील निमसाखर गावातील पानसरे मळा येथे ग्रामस्थांच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या भगवान बाबा मंदिराचे बांधकाम नुकतेच पुर्ण झाले असून आज मंदिरात भगवान बाबांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा तसेच कलशारोहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाच्या निमित्ताने निमसाखर सह आजूबाजूच्या गावातील असंख्य नागरिकांनी येऊन आवर्जून देवदर्शन घेतले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने निमसाखर येथे आलेल्या माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे श्री प्रविणभैय्या माने यांनी मनोभावे देवदर्शन घेऊन उपस्थित नागरिकांशी संवाद साधला, तसेच आपल्या वैयक्तीक निधीतून २५ हजार रुपये रक्कम मंदिरासाठी देणगी स्वरूपात दिली. यावेळी शेखर पानसरे, प्रविण घोळवे, सचिन पानसरे, विक्रम चौधरी, सोनू पानसरे, अक्षय पानसरे, पांडुरंग पानसरे, सतीश पानसरे, तानाजी पानसरे, सागर पानसरे, पोपट पानसरे, संतोष पानसरे, सोनू चौधरी, नितीन पानसरे, लक्ष्मण पानसरे, रवीं. आशितोष भोसले, नागेश गायकवाड हे यावेळी उपस्थित होते.





## दर्शनाळ ग्रामपंचायत सदस्य आकाश माने यांचे ग्रामस्थांकडून सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी :दर्शनाळ गावचे ग्रामपंचायत सदस्य आकाश पाराप्पा माने यांच्या प्रयत्नातून गावातील गरजू १२ व्याक्तींचे शिधा पत्रीका मंजूर करून १५ आँगस्ट दिवशी त्यांना रेशन वाटप करण्यात आले, त्या मुळे आकाश माने यांचे सत्कार करण्यात आला यावेळी दर्शनाळ गावचे प्रगतीशील शेतकरी आप्पू विभूते ,पंढरी माने, शाहू माने, सुभाष माने, जीवन माने, व, सर्व मिलिंद तरूण मंडळाचे कार्यकरते उपस्थित होते..